# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 15/05/2023 (सोमवार) दुपार

---

## मोटरसायकल चोरी

१) पो.स्टे. जलालखेडा :— अंतर्गत ०१ किमी अंतरावर मौजा जलालखेडा येथे दिनांक २७/०४/२०२३ चे २०/३० वा. सुमारास फिर्यादी नामे— शैलेंद्र चिंदुजी धर्मे, वय ४२ वर्ष, रा. जलालखेडा वार्ड नं. ४ ता. नरखेड हा त्याची हिरो होंडा स्प्लेंडर मोटरसायकल MH X 6397 ही नर्मदा सभागृह जलालखेडा समोर उभी करून लग्न रिसेप्शन करीता आत गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने मोटर सायकलचे हॅण्डल लॉक तोडुन संमती शिवाय फिर्यादीची हिरो होंडा स्प्लेंडर मोटरसायकल MH X 6397 किंमती अंदाजे १००००/— रू. चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. जलालखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोना/१००६ दिनेश जोगेकर मो. नं. ८८३०६०४५०६ हे करीत आहे.

२) पो.स्टे. काटोल :— अंतर्गत ०२ किमी अंतरावर रॉक्स सेलिब्रेशन हॉल समोर, बायपास रोड, काटोल येथे दिनांक १०.०५.२०२३ चे १२/०० वा. ते १४.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— प्रकाश गणेशराव मस्की, वय ३८ वर्ष, रा. इसबरी ता. वरुड जि. अमरावती हा त्याचे नातेवाइकांचे लग्नात गेला असता त्याचेकडे असणारे वाहन क्र. एम. एच.—२७ ए. ई. —४४६७ पॅशन प्लस १०,०००/— रू. ही काटोल येथील रॉक्स सेलिब्रेशन हॉल, काटोल समोरील आवारात सदरची मोटरसायकल उभी करुन हॉलमध्ये गेले व लग्न लावुन परत आले असता मोटरसायकल दिसुन आली नाही. काणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीची मोटरसायकल चोरुन नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक पविण पवार पोस्टे काटोल मो. नं. ९९२१५६६२५५ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत ०१ किमी अंतरावर जनता लॉन समोर सावनेर येथे दिनांक ०९/०५/२०२३ चे १२/३० वा. ते १६/०० वा. पर्यंत फिर्यादी नामे– राकेश गंगाराम खुसपुरे, वय ३० वर्ष रा. खडगाव कळमेश्वर हे जनता सेलिब्रेशन हॉल सावनेर येथे लग्न कार्यक्रमा करीता त्याची बजाज पल्सर १५० मोटार सायकल क्र. एम. एच. –४० झेड– ८७९९ ने गेले असता व मोटरसायकल ही आंब्याच्या झाडाखाली ठेवुन फिर्यादी लग्नाच्या कार्यक्रमाला गेले असता लग्नाचा कार्यक्रम संपल्या नंतर फिर्यादी त्याच्या पत्नीसह त्याच्या घरी जाण्या करीता त्याचे बजाज पल्सर १५० मोटार सायकल क्र. एम. एच. –४० झेड– ८७९९ अंदाजे किंमती १००००/– रू. ही फिर्यादीची मोटरसायकल दिसली नाही आजु बाजुला पाहणी केली असता दिसली नाही फिर्यादीची बजाज पल्सर १५० मोटार सायकल क्र. एम. एच.४० झेड ८७९९ मोटार सायकल ही कोणीतरी अज्ञात ईसमाने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ/१५२२ राय हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**